मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 78 कोटींची विक्रमी पाणीपट्टी वसुली

## गतवर्षी पेक्षा 15 कोटींची अधिक पाणीपट्टी वसुल : 300 पेक्षा अधिक नळजोड खंडित

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागाने 977 कोटींचा सर्वाधिक कर वसूल केल्यानंतर पाणीपट्टी वसुलीचा एक नवा विक्रम झाला आहे. 78 कोटी 57 लाखांची पाणीपट्टी वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे. त्यामुळे कर संकलन आणि पाणीपट्टी एकत्र वसूल करण्याचा निर्णय अतिशय यशस्वी झाला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा 1 लाख 76 हजार अधिकृत नळ जोडधारक आहेत. महापालिकेला पाणी पुरवठा विभागकडून म्हणावे तसे उत्पन्न मिळत नसून थकबाकीही वाढत होती. एकीकडे मिळकत करातून दिवसेंदिवस उत्पन्न वाढत असताना पाणीपट्टी मात्र थकीत राहत असल्याने पालिकेच्या उत्पन्नावर परिणाम होत होता. तसेच पाणीपट्टीची थकबाकीही मोठ्या प्रमाणावर राहत होती.

राज्यातील काही महापालिकांमध्ये पाणीपट्टी वसुली आणि कर वसुलीचे एकत्रित कामकाज चालते. त्या महापालिकांचा पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने अभ्यास केला. 2023-24 या आर्थिक वर्षापासून कर संकलन आणि पाणीपट्टी एकत्र वसुल करण्याचा धाडसी निर्णय आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी घेतला. हा निर्णय सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी यशस्वी करून दाखवला असून 2023-24 या आर्थिक वर्षात तब्बल 78 कोटी 57 लाख रूपयांची पाणीपट्टी वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे.



**300 पेक्षा अधिक नळजोड खंडित..**

महापालिकेच्या वतीने कर संकलन विभागाच्या वतीने कर वसुली जोरदार सुरू असतानाच 2023-24 या आर्थिक वर्षात पाणी पट्टी वसुलीकडे आपला मोर्चा वळवला. गेल्या अनेक वर्षांपासून पाणी पट्टी न भरणाऱ्या 300 पेक्षा जास्त मालमत्ता धारकांचे नळजोड खंडित करण्याची कारवाई केली. मीटर निरीक्षक यांना कर संकलन वसुली पथकाची साथ मिळाली आणि या कारवाईमुळेच 60 कोटींच्या पुढे कधीही वसूल न होणारी पाणीपट्टी आता 80 कोटींच्या घरात गेली आहे.

> मालमत्ता कर आणि पाणीपट्टी यांचे एकत्रीकरण निविदा प्रक्रिया चालू आहे. त्यामुळे नागरिकांना पाणीपट्टी आणि मालमत्ता कर एकत्रित भरणे शक्य होणार आहे. त्यामुळे पालिकेचे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वाचणार आहे. तसेच पालिकेची पाणी पुरवठा स्कॅडा सिस्टिम शेवटपर्यंत म्हणजे नळ कनेक्शनपर्यंत वापरता येईल का याचा विचार चालू आहे. त्यामुळे पाणी गळती, नेमकी महसूल गळती यांचा ताळमेळ घालणे शक्य होईल. त्यामुळे पाणी पुरवठा सेवेचा दर्जा वाढवण्यात मदत होईल.अर्थात हे काम आव्हानात्मक राहणार आहे.
>
> **– शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# भोसरीत साकारणार महाराष्ट्रातील सर्वात मोठे “बैलगाडा शर्यत शिल्प”

## आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा : महापालिका प्रशासनाकडून शिल्पाचे काम प्रगतीपथावर


**पिंपरी | प्रतिनिधी**

बैलगाडा शर्यत आणि शेती-माती-संस्कृतीप्रति प्रचंड आग्रही असलेले भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आता महाराष्ट्रातील सर्वात मोठे बैलगाडा शर्यत शिल्प उभारण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून भोसरीत शिल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. हे शिल्प बैलगाडा शर्यतप्रेमी आणि नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघातील आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र व भोसरी गावजत्रा मैदान परिसरात येथे ग्रामसंस्कृती, पारंपरिक क्रीडा प्रकार यासह बैलगाडा शर्यत अशी आकर्षक शिल्प उभारण्यात येणार आहेत. त्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून हे काम हाती घेण्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रभाग क्रमांक ७ येथील भोसरी स्मशान भूमी ते अग्निशामक केंद्रापर्यंतचा रस्ता अद्ययावत पद्धतीने विकसित करण्यात येत आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती प्रशिक्षण केंद्र, आंतरराष्ट्रीय दर्जाचे कबड्डी संकूल उभारण्यात आले आहे. तसेच, भोसरी स्मशानभूमीचेही नूतनीकरण यापूर्वीच झाले आहे.

भोसरीतील गावजत्रा मैदान येथे महाराष्ट्र संस्कृती आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा खेळ असलेला परंपरागत बैलगाडा घाट आहे. महाराष्ट्राची ग्रामसंस्कृती, बैलगाडा शर्यत यासह कुस्तीसारख्या मर्दानी खेळाबाबत नव्या पिढीत जनजागृती व्हावी. आपली शेती-



माती आणि संस्कृतीबाबत अभिमान निर्माण व्हावा. या करिता या रस्त्याच्या सुशोभिकरणात विविध शिल्प उभारण्यात येणार आहे.

**बैलगाडा शर्यतप्रेमींमध्ये समाधान..**

राज्यातील बैलगाडा शर्यतींवरील बंदी उठवण्यासाठी आमदार लांडगे यांनी राज्यव्यापी चळवळ उभी केली होती. अखिल भारतीय बैलगाडा शर्यत संघटनेच्या माध्यमातून या लढ्याला बळ देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयात यशस्वी लढा दिला. त्यानंतर राज्यातील बैलगाडा शर्यती सुरू झाल्या. त्यानंतर आमदार लांडगे यांच्या पुढाकाराने भारतातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत घेण्यात आली. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले होते. आता बैलगडा शर्यत शिल्प उभारण्यात येणार आहे. त्यामुळे गाडामालक, बैलगाडा प्रेमींमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

# 3 दिवसांत 619 ''बुलेट राजांवर'' कारवाई

## पुण्यातील रस्त्यावर बुलेटच्या सायलेन्सरचा 'भोंगा' : कारवाई सुरुच राहणार!

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात गाड्यांच्या बाबतीत हौशी कलाकारांची काही कमतरता नाही. याच हौशी गाडी चालकांवर आता पुण्यातील वाहतूक विभागातील पोलिसांची करडी नजर असणार आहे. पुण्यातील विविध परिसरात आता हौशी बुलेट चालकांवर कारवाई करण्यात येत आहे. पुण्यातील विविध परिसरातील नागरिकांनी या संदर्भात तक्रारी दिल्याची माहिती आहे. पुण्यात अवघ्या 3 दिवसात 619 "बुलेट राजांवर" पोलिसांनी कारवाई केली आहे.

बुलेटच्या सायलेन्सरमध्ये फेरबदल करून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या दुचाकीस्वारांवर वाहतूक शाखेने कारवाईचा बडगा उगारलाय आहे. गेल्या तीन दिवसांत विशेष मोहीम राबवून 619 दुचाकीस्वारांवर कारवाई करण्यात आली आहे. सर्वाधिक कारवाई पुण्यातील मुंढवा परिसरात करण्यात आली असून या ठिकाणी 85 दुचाकीस्वारांवर कारवाई करण्यात आली आहे.



सिंहगड रोड पोलिसांनी परिसरातदेखील बुलेट मोटारसायकलींवर कारवाई करत त्यांच्या वाहनांचे सायलेन्सर जप्त केले आहेत. आवाज निर्माण करणारे मॉडिफाइड सायलेन्सर बसविणाऱ्या 33 बुलेट बाईक चालकांवर कडक कारवाई करण्यात आली. सिंहगड रोड पोलिसांनी वडगाव पुलाखाली बुधवारी रात्री आठ ते गुरुवारी सकाळी सहा वाजेपर्यंत नाकाबंदी केली असून या कारवाईत 117 दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. फॅन्सी नंबर प्लेट, ट्रिपल सीट ड्रायव्हिंग, विनापरवाना वाहन चालविणे, बुलेट मोटारसायकलवरील अनधिकृत सायलेन्सर सुधारणेसह विविध नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ही वाहने जप्त करण्यात आली. मोटार वाहन कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी एकूण 33 बुलेट चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.मोटार वाहन कायद्याच्या कलम 207 नुसार सुधारित सायलेन्सर बसविलेली 11 वाहने जप्त करण्यात आली.

### कारवाई सुरुच राहणार!

मोठा आवाज करणाऱ्या सायलेंसरवर आणि दादा, भाई, लव्ह असे शब्द लिहून परिसरात दहशत पसरवत असलेल्या सायलेंसरच्या चालकावरदेखील कारवाई करण्यात येणार असल्याचं वाहतूक विभागाकडून सांगण्यात आलं आहे. त्यामुळे बुलेट चालवून शहरात हवा करणं महागात पडणार आहे. त्यामुळे ज्यांच्या गाडीला अशा प्रकराचे आवाज करणारे सायलेंसर असतील तर त्यांनी साधे सायलेंसर बसवून घ्यावेत, असं आवाहन पोलिसांकडून करण्यात आलं आहे. बुलेटला वेगळा सायलेन्सर बसवतात.त्यामुळे शहरातील अनेक भागात ध्वनी प्रदूषण होतं. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये ध्वनी प्रदूषणाची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यासोबतच वायु प्रदूषणाचा प्रश्नदेखील कायम आ वासून उभा असतो. त्यामुळे कारवाई करत आहेत.

# सवा दोन कोटींचा ऐवज फिर्यादींना परत

## पुणे पोलिसांच्या परिमंडळ एकची कौतुकास्पद कामगिरी : नागरिकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू

**पुणे | प्रतिनिधी**

चोरीला गेलेले मोबाईल असोत की दागिने, वस्तू असोत की मौल्यवान ऐवज... पोलीस दफ्तरी तक्रार दाखल केल्यानंतर देखील चोरांचा ठावठिकाणा लागेल की नाही याची खात्री नसते. तर, चोरीला गेलेला मुद्देमाल परत मिळेल अशी आशा देखील नागरिकांनी सोडून दिलेली असते. अशातच जर नागरिकांना पोलिसांनी त्यांचा चोरीला गेलेला ऐवज सन्मानाने परत केला तर? असाच सुखद धक्का अनेक नागरिकांना पोलिसांनी दिला. विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केलेला तब्बल २ कोटी ३१ लाख ५४ हजार ४८९ रुपयांचा ऐवज पोलिसांनी तक्रारदारांना सुपूर्द केला. पुणे पोलिसांच्या परिमंडल एकच्या हद्दीतील खडक, समर्थ, फरासखाना, शिवाजीनगर व डेक्कन पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेला हा ऐवज होता. यामध्ये दुचाकी आणि तीन चाकी वाहनांचा समावेश आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायालयाकडून हा मुद्देमाल परत करण्याबाबत परवानगी घेण्यात आली. न्यायालयाच्या आदेशानुसार हा मुद्देमाल फिर्यादी यांना सोमवारी प्रदान करण्यात आला. पोलीस आयुक्तालयामधील कॉप्स एक्सलन्स हॉलमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहपोलीस आयुक्त प्रवीण पवार, अतिरिक्त पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) प्रवीणकुमार पाटील, गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, परिमंडळ एकचे उपायुक्त संदीप




सिंह, सहायक पोलीस आयुक्त रुक्मिणी गलंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त साईनाथ ठोंबरे, वरिष्ठ निरीक्षक प्रशांत भस्मे, रविंद्र गायकवाड, मारुती पाटील, चंद्रशेखर सावंत, विपीन हसबनीस उपस्थित होते.

समर्थ पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या २ गुन्ह्यातील ३ लाख ९४ हजार ५०० रूपयांचे मौल्यवान दागिने व रोख रक्कम, खडक पोलीस ठाण्याच्या २ गुन्ह्यातील २ लाख ७९ हजार ३५० रुपयांचे दागिने व ३७ लॅपटॉप, फरासखाना पोलीस ठाण्याच्या ७ गुन्ह्यातील २ कोटी १४ लाख ९४ हजार ६३९ रूपयांचे दागिने, दुचाकी-तीनचाकी वाहने, मोबाईल फोन, शिवाजीनगर पोलीस ठाण्यातील ७ गुन्हयातील ८ लाख २२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, डेक्कन पोलीस ठाण्यातील २ गुन्ह्यातील १ लाख ६४ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने असा एकूण २ कोटी ३१ लाख ५४ हजार ४८९ रुपयांचा मुद्देमाल परत करण्यात आला. हा मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या खडक, समर्थ, फरासखाना, शिवाजीनगर व डेक्कन पोलीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

# महापालिकेच्या बांधकाम विभागाला 'अच्छे दिन'

## यंदा बांधकाम विभागाने 750 कोटींचे ठेवले होते उद्दिष्ट : 804 कोटी जमा करत उद्दिष्ट केले पूर्ण

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका हद्दीत शहराच्या कानाकोपऱ्यात होणाऱ्या नव-नव्या गृहप्रकल्पांना बांधकाम परवानगी दिल्याने बांधकाम विभागाने उत्पादनाची उद्दिष्टपूर्ती केली आहे. यंदाच्या २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात ७५० कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. पण, बांधकाम विभागाकडून ८०४ कोटी रुपये महसूल पालिका तिजोरीत जमा केला आहे. त्यामुळे बांधकाम विभागाला अच्छे दिन आल्याचे दिसत आहे.

महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागाच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. चालू सन २०२३ - २०२४ या आर्थिक वर्षात बांधकाम विभागाने उत्पन्नाची उद्दिष्टपूर्ती केली आहे. बांधकाम विभागाने ७५० कोटींचे उद्दिष्ट ठेवले असताना मार्चअखेर ८०४ कोटी रुपये पालिका तिजोरीत जमा झाले आहेत. मागील २०२१ - २२ या आर्थिक वर्षात बांधकाम क्षेत्रात तेजी होती. बांधकाम विभागात नवीन गृहप्रकल्पाची संख्या वाढली होती. नवीन बांधकामाची परवानगी घेण्याचे प्रमाण वाढल्याने तेव्हा १०६० कोटी रुपये पालिका तिजोरीत जमा झाले होते. तर २०२२- २०२३ या आर्थिक वर्षात बांधकाम विभागाची आर्थिक घडी विस्कटली होती.

तेव्हा शहरात बांधकाम होऊनही गुंतवणूकदार घरे घेण्यास येत नव्हती. घरांच्या किमतीत कमी झाल्याचे जाणवत होते. त्यामुळे नवीन बांधकाम परवानगी घटल्या होत्या. तेव्हा बांधकाम विभागाचे उत्पन्न घटून ते ७८१ कोटींवर आले होते. यंदाही बांधकाम क्षेत्रात आर्थिक चणचण निर्माण झाली होती. त्याचा परिणाम बांधकाम विभागाच्या आर्थिक वर्षाच्या तिजोरीवर झाला आहे. पण, यावेळेस बांधकाम विभागाने ७५० कोटींचे उद्दिष्ट ठेवले होते.



२०२३ -२०२४ आर्थिक वर्षात बांधकाम परवानगी विभागाला 'अच्छे दिन' आले आहेत. बांधकाम क्षेत्र पूर्वपदावर येऊ लागले आहे. त्याचबरोबर रेरा कायद्यामुळे बिल्डरांनी पूर्वीचे प्रकल्पांची नोंदणी आणि बांधकाम पूर्णत्वाचे दाखलेही मोठ्या प्रमाणात घेतले आहेत. तसेच नव्याने बांधकाम प्रकल्पदेखील वाढू लागले आहेत.

अनेक बांधकाम व्यावसायिकांनी बांधकाम पूर्णत्वाचे दाखले मिळवून घेतले आहेत. त्यामुळे यंदा महापालिकेच्या उत्पन्नात भर पडली आहे. बांधकाम विभागाला यंदा ७५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट होते. ते उद्दिष्ट बांधकाम विभागाने पूर्ण केले आहे. त्यामुळेच तिजोरीत ८०४ कोटी रुपये जमा झाले आहेत, अशी माहिती सहशहर अभियंता मकरंद निकम यांनी दिली.

# पिंपरी-चिंचवडवर पाणीटंचाईचे संकट

## पवना धरणात 44.72 टक्के इतका पाणीसाठा शिल्लक : पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाईस टाळाटाळ

**पिंपरी| प्रतिनिधी**

उन्हाचा तडाखा वाढल्याने बाष्पीभवनामुळे शहरवासीयांची तहान भागविणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठ्यात घट होऊ लागली आहे. आजमितीला धरणात ४४.७२ टक्के इतका पाणीसाठा शिल्लक आहे. उपलब्ध पाणीसाठा जूनअखेरपर्यंत पुरेल असा पाटबंधारे विभागाचा अंदाज आहे. मात्र, पावसाळा लांबल्यास मागील साडेचार वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठ्याला सामोरे जात असलेल्या नागरिकांना आणखी पाणीटंचाईस सामोरे जावे लागेल, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरासाठी महापालिका पवना धरणातून दररोज ५१० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी घेते. हे पाणी पवना नदीवरील रावेत बंधारा येथून अशुद्ध जलउपसा केंद्रात उचलले जाते. निगडीतील पेठ क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून शहरात पुरविले जाते. गेल्या काही दिवसापांसून आंद्रातून होणारा अपुरा पाणीपुरवठा आता सुरळीत झाला असून, महापालिका ८० एमएलडी पाणी इंद्रायणी नदीवरील निघोजे येथील बंधाऱ्यातून उचलते. या पाण्यावर चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून चिखली, मोशी, चऱ्होली, भोसरी परिसरात पाणीपुरवठा केला जात आहे.

तर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून महापालिका २० एमएलडी पाणी घेते असे एकूण ६१० एमएलडी पाणी शहराला एका दिवसाला दिले जात आहे. एप्रिल महिना सुरू झाला असून, उन्हाळा तीव्र होत चालला आहे. उन्हाचा पारा चाळिशीपार होऊ लागला आहे. उन्हाच्या झळा आणखी वाढण्याची शक्यता आहे. बाष्पीभवनामुळे पवना धरणातील पाणीसाठा कमी होत आहे. धरणात आजमितीला ४४.७२ टक्के पाणीसाठा आहे. वाढत्या उन्हाबरोबरच पाण्याची मागणी वाढली आहे. पाण्याची वाढती मागणी, बाष्पीभवन यामुळे धरणातील पाणीसाठा कमी होत आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.



### गेल्या वर्षीपेक्षा कमी पाणी

शहराला मुख्यतः मावळातील पवना धरणातून पाणीपुरवठा केला जात आहे. पवना धरणात आजमितीला ४४.७२ टक्के पाणीसाठा आहे. हा साठा जूनअखेरपर्यंत पुरेल एवढा आहे. गतवर्षी ४६.३७ टक्के साठा होता. गतवर्षीपेक्षा १.६५ टक्क्याने कमी असून, पाण्याची मागणी वाढली आहे.

### पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाईस टाळाटाळ

पिण्याच्या पाण्याने वाहने, रस्ते, घर, गृहनिर्माण संस्था परिसर धुताना आढळल्यास प्रथम नोटीस बजावण्यात येईल. दुसऱ्यांदा पिण्याच्या पाण्याचा गैरवापर करताना आढळल्यास नळजोड तोडण्यात येईल, असा इशारा महापालिकेने दिला होता. त्यानंतरही पिण्याच्या पाण्याने वाहने, अंगण, रस्ते धुण्याचे प्रकार सुरू असून, पाण्याची नासाडी केली जात आहे. मात्र, पाणीपुरवठा विभागाकडून कारवाई केली जात नसल्याचे चित्र आहे. मनुष्यबळ कमी असल्याने कारवाई करता येत नसल्याचे अधिकारी सांगत आहेत.

ऊन वाढत आहे. ऊन वाढल्याने बाष्पीभवनामुळे धरणातील पाणी कमी होत आहे. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पवना धरणाचे शाखा अभियंता रजनीश बारिया यांनी केले.

# धोकादायक वाडे उतरवण्यास नागरिकांचा विरोध

## महापालिकेकडून 17 पेठांमध्ये असलेल्या 140 वाड्यांचे सर्वेक्षण, 95 धोकादायक वाडे

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून शहरातील १७ पेठांमध्ये असलेल्या १४० वाड्यांचे सर्वेक्षण केले होते. यातील धोकादायक ९५ धोकादायक वाडे महापालिकेकडून उतरलविण्यात आले आहेत. मात्र राहिलेले ४५ धोकादायक वाडे उतरविण्यासाठी नागरिकांकडून विरोध केला जात आहे. पावसाळ्यापूर्वी महापालिकेला धोकादायक वाडे उतरावे लागणार आहेत. त्यामुळेत आता विरोध करणाऱ्या नागरिकांना रोखण्यासाठी पोलिसांची मदत घेतली जाणार असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

महापालिकेकडून पावसाळ्यापूर्वी नाले सफाई, ड्रेनेज लाईनची कामांसह धोकादायक बांधकामांची देखील माहिति घेतली जाते. शहरात मध्यवर्ती पेठांमध्ये जुने वाडे आणि धोकादायक इमारती आहेत. पालिकेकडून दरवर्षी अशा वाड्यांचे सर्वेक्षण करून कमी धोकादायक, मध्यम धोकादायक तसेच अतिधोकादायक असे वर्गीकरण केले जाते. संबंधित मालकांना तशा सूचना केल्या जातात तर धोकादायक वाडे उतरवण्यास सांगितले जाते. तशी महापालिकेकडून नागरिकांना नोटीसा देखील दिल्या जातात. मात्र वाड्यातील आपली राहण्याची जागा जाईल या भीतीने नागरिका वाड्यातून बाहेर पडण्यास नकार देतात. त्यावर महापालिकेकडून संबंधित नागरिक किती जागेच्या खोलीमध्ये राहतात त्याची मोजणी करुन ऐरिया प्रमाणपत्र दिले जाते. या प्रमाणपत्राच्या आधारावर वाडा उतरवल्यानंतर पुन्हा त्याठिकाणी नव्याने बांधकाम करताना त्यावेळी संबंधित व्यक्तील हे प्रमाणपत्र दाखवून तेवढ्या जागेवर दावा करता येतो. त्यामुळे कोणत्याही नागरिकाचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेतली जात असल्याने नागरिकांनी धोकादायक वाडे खाली करावेत. असे आवाहन पालिकेने केले आहे.



महापालिकेकडून पावसाळ्यापूर्वी शहरातील जातात, पालिकेने दोन वर्षांपूर्वी केलेल्या सर्वेक्षणात १४० धोकादायक वाडे आढळून आले होते. मागील वर्षी त्यातील ९५ वाडे उतरवण्यात आले, तर ४५ वाडे उतरवण्यास नागरिकांकडून विरोध होत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. जागामालकांनी वाडे न उतरवल्यास पालिकेकडूनच ते उतरविले जातात. तसेच त्याचा खर्चही वाडामालकांकडून वसूल केला जातो. मात्र, जागामालक आणि भाडेकरूंमधे वाद असल्याने अशा वड्यांची दुरूस्ती जागामालक करत नाहीत, असे वाडे पावसाळ्यात कोसळण्याचा धोका असतो. दरम्यान, या वाड्यांना नोटीस बजाविण्यात आली असून ते धोकादायक असल्याचे फलकही लावण्यात आले आहेत. १ एप्रिल पासून पुन्हा शहरातीरल धोकादायक वाड्यांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. तसेच ४५ वाडे उतवण्यासाठी नोटीसा दिल्या जाणार असून पोलिसांची मदत घेतली जाणार आहे.

> “ पावसाळापूर्व कामांच्या आढावा बैठकीत शहरात ४५ धोकादायक वाडे असल्याची माहिती बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे. मात्र, हे वाडे काढण्यास नागरिकांचा विरोध आहे. त्यामुळे, त्यांनी महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन आम्ही करत आहोत.
>
> **- राजेंद्र भोसले, महापालिका आयुक्त.**

> वाड्यामध्ये राहणाऱ्या व्यक्तीला जागा जाण्याची भीती असते. मात्र पालिकेकडून त्यांना ऐरिया प्रमाणपत्र दिले जाते. वाडा मालक आणि संबंधित व्यक्ती यांनी त्यांचे वाद आपआपसात मिटवायचे असतात. पुनर्वसन करण्याची तरतूद कायद्यात नाही.
>
> **- प्रशांत वाघमारे, शहर अभियंता.**

# पुणेकरांनो पाणी जपून वापरा

## शहरातील बहुतांश भागातील गुरुवारी पाणीपुरवठा बंद राहणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेने बाणेर, बालेवाडी, कोथरूड, कात्रज आणि विमाननगर सह काही भागात विविध जलवाहिन्यांमधील नियोजित विद्युत दुरुस्तीमुळे येत्या गुरुवारी म्हणजेच ४ एप्रिलला पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

वारजे जलशुद्धीकरण केंद्र, चांदणी चौक पाण्याची टाकी, पॅनकार्ड क्लब पाण्याची टाकी आणि भामा आसखेड प्रकल्पातील कामांमुळे शहराच्या काही भागांना याचा फटका बसणार आहे. नियोजित कामांमुळे त्या दिवशी या भागात पाणीटंचाई जाणवेल, असे मनपा पाणी विभागप्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले.

### कोणत्या भागात पाणीपुरवठा बंद राहणार?

पाषाण, बावधन, सुस रोड, सुतारवाडी, वारजे माळवाडी, काकडे सिटी परिसर, महात्मा सोसायटी, बाणेर, बालेवाडी, करवेंगार, वारजे, कात्रज, कोंढवा, खादी मशीन चौक, लोहगाव, विमाननगर, विश्रांतवाडी, येरवडा, धानोरी, खराडी, रामटेकडी, सोलापूर रोड, कोरेगाव पार्क, फुरसुंगी आणि हडपसरचा काही भागात पाणी नसणार आहे. त्यासोबतच पाषाण, भूगाव रस्ता परिसर, कोकाटे वस्ती, सेंटीन हिल सोसायटी, मधुवन सोसायटी, बावधन परिसर, उजवी आणि डावी भुसारी कॉलनी, चिंतामणी सोसायटी, पाषाण, परमहंसनगर, शास्त्रीनगर, न्यू लक्ष्मीनगर, सोमेश्वरवाडी, सुतारवाडी, निम्हणमळा, लम्हाणतांडा, सूस रस्ता, कुंभारवाडी टाकी, सिप्ला फाउंडेशन, रेणुकानगर, हिल व्ह्यू सोसायटी, पॉप्युलरनगर, वारजे माळवाडी परिसर, गोकुळनगर, अतुलनगर, महात्मा सोसायटी परिसर, भुजबळ टाउनशिप, एकलव्य कॉलेज परिसर, कोथरूड क्षेत्रीय कार्यालय परिसर, कांचन गंगा, अलकनंदा सोसायटी, सहजानंद, किर्लोस्कर कंपनी, लक्ष्मीनगर झोपडपट्टी. पुणे-मुंबई बाह्यवळणाच्या दोन्ही बाजू, हिंगणे होम कॉलनी, कर्वेनगर गावठाण, गोसावी वस्ती, बाणेर, बालेवाडी, चाकणकर मळा, पॅनकार्ड क्लब रस्ता, पल्लोड फार्म, शिंदे पारखे वस्ती, विधाते वस्ती, मेडीपॉईंट रस्ता, विजयनगर, आंबेडकरनगर, दत्तनगर, कर्वेनगर गावठाण परिसर, तपोधाम, सोसायटी, शाहू कॉलनी, वारजे जकात नाका, गोखलेनगर, शिवाजीनगर, मॉडेल कॉलनी, कोथरूड, वडार वस्ती, हॅपी कॉलनी, डहाणूकर कॉलनी, सुतारदरा, किष्किंधानगर, जयभवानी नगर, रामबाग कॉलनी, हनुमान नगर, केळेवाडी, आयडीयल कॉलनी, सेनापती बापट रस्ता, जनवाडी, वैदूवाडी, भोसलेनगर, खैरेवाडी, भांडारकर रस्ता, प्रभात रस्ता, हनुमाननगर, जनवाडी, संगमवाडी, उत्तमनगर, शिवणे, कोंढवे-धावडे, न्यू कोपरे, रामनगर, अहिरेगाव, माळवाडी, गोकुळनगर पठार या भागाचा पाणीपुरठा बंद राहणार आहे. तसेच हिंगणे, आनंदनगर, माणिकबाग, दामोदरनगर, विश्रांतीनगर, वडगाव बुद्रुक, मीनाश्री पुरम, कात्रज आगम मंदिर परिसर, बालाजीनगर, दत्तनगर, टेल्को कॉलनी परिसर, संतोषनगगर, दत्तनगर, आंबेगाव रस्ता, सुखसागरनगर, धनकवडी, आंबेगाव पठार, संतोषनगर, जांभूळवाडी रस्ता, धनकवडी गावठाण परिसरा, तळजाई परिसर, सहकारनगर भाग १ आणि २, कात्रज गाव, गुजरवाडी फाटा, निंबाळकर वस्ती, सुखसागरनगर भाग १ आणि २, कात्रज-कोंढवा रस्ता, गोकुळनगर, इस्कॉन मंदिर परिसर, टिळेकर नगर, येवलेवाडी, कोंढवा गाव, खडी मशिन परिसर, लोहगाव, विमाननगर, वडगावशेरी, विश्रांतवाडी, फुलेनगर, येरवडा, धानोरी, खराडी गावठाण, आपले घर, तुळजाभवानी नगर, थिटे वस्ती, तुकारामनगर, चंदननगर, रामटेकडी, सय्यदनगर, हडपसर गावठाण, सातववाडी, गोंधळेनगर, ससाणेनगर, काळेपडळ, मुंढवा, केशवनगर, मांजरी, शेवाळेवाडी, बीटी कवडे रस्ता, भीमनगर, कोरेगाव पार्क, साडेसतरा नळी, महंमदवाडी, हांडेवाडी, फुरसुंगी, उरुळी देवाची, खडकी, पुणे कॅन्टोन्मेंट परिसर या भागाचा पाणीपुरठा बंद राहणार आहे.

